## नियमित दिवाणी दावा क्र.५७९/२०१७ मधील आदेश नि.क्र.१९
## (CNR NO. MHSO130006652017)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा अबेटमेंट आदेश रद्दबातल करण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

वादीने प्रतिवादींविरुध्द वाटपाकरिता दावा दाखल केला आहे. दरम्यानचे काळात प्रतिवादी नं.२ ही मयत झाली आहे. वादीने प्रतिवादी नं.२ चे वारस अभिलेखावर घेण्याकरिता अर्ज दिला होता. यातील वादी व इतर प्रतिवादी हेच प्रतिवादी नं.२ चे कायदेशीर वारस आहेत अन्य कोणीही वारस नाही. वादीने मयताचे वारस मुदतीत अभिलेखावर घेतले नाहीत, वारस अभिलेखावर घेणेस विलंब झाला असल्याने अबेटमेंटचा हुकूम पारीत करण्यात आला आहे. प्रतिवादी नं.२ चे वारस अभिलेखावर मुदतीत घेणे जरुरीचे व गरजेचे होते परंतु मयताचा दाखला लवकर व मुदतीत मिळाला नसल्याने विलंब झाला आहे. त्यामुळे अबेटमेंटचा आदेश रद्दबातल होवून वारस नोंदीकरिता झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी नं.१ यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, अर्ज खरा नाही, कायद्याने टेनेबल नाही. सदर कामातील प्रतिवादी नं.२ ही दि.९/२/२०१८ रोजी मयत झाली आहे. त्यानंतर दावा अबेट झाल्यानंतर दि.३/४/२०१९ रोजी फक्त वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज दिला. त्यानंतर दि.२३/११/२०२२ रोजी अबेटमेंट आदेश रद्दबातल होणेकरिता अर्ज दिला. सदरील प्रतिवादी नं.२ ही बाकीचे प्रतिवादींची आई आहे. त्यामुळे वरील नमूद कारण हे संयुक्तिक वाटत नाही. तरी अर्ज नामंजूर करणेत यावा. जर सदरचा अर्ज मंजूर करणेचे निष्कर्षापर्यंत पोहोचले असेल तर विशेष खर्च रुपये २०००/– प्रतिवादीस मिळावी.

४. अर्ज, म्हणण्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीचे विधिज्ञ युक्तीवादाकरिता गैरहजर. त्यामुळे सदर अर्ज वादीचे युक्तीवादाविना चालविण्यात आला. प्रतिवादी क्र.१ तर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी नं.२ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेतले नसल्याने वादीचा दावा अबेट झाला आहे. प्रतिवादी क्र.२ चे मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ते दि.९/२/२०१८ रोजी मयत झाले आहेत. वादीचा दावा स्थावर मिळकतीचे वाटपाबाबत असल्याने वादी, प्रतिवादीमधील वादाचे अंतिम

निराकरण होवून वाद कायमस्वरुपी संपुष्टात येणेसाठी सदर अबेटमेंट आदेश रद्दबातल करणे जरुरीचे आहे अन्यथा वादीचे अपरिमित व कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब वादीविरुध्द अबेटमेंट आदेश रद्द करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व संयुक्तिक वाटते. तसेच अर्जातील नमूद कारण व दाव्याचे स्वरुप ध्यानात घेता वादीस प्रतिवादी नं.२ चे वारस अभिलेखावर घेण्याकरिता झालेला विलंब माफ करणे उचित होईल. सबब पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

**<u>आदेश</u>**

१. वादीविरुध्द पारीत अवसान आदेश रुपये ४००/– वादीवर खर्च बसवून रद्दबातल करण्यात येते.

२. वादीस प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरिता झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. वादीने खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ यांना पुढील तारखेपर्यंत द्यावी.

दि.६/६/२०२३.

(श्रीमती एच.यु.यु. पाटील)
४थे सह दि.न्या.क.स्तर, बार्शी

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Y.V.Sital |
| (b) | Court | : | Smt. H.U.U. Patil,<br>4th Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 6/6/2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 7/6/2023 |